---

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पाटण यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी महेश व्ही.फडे)

**रे.दि.मु.नं.०२/२०१७.** **निशाणी ५.**

राजकुमार बबनराव मोरे वगैरे ....**वादी**

**विरुध्द**

तानाजी आनंदराव मोरे वगैरे ....**प्रतिवादी**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ०१ नूसार तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

मौजे कोंजवडे, ता.पाटण येथील जमीन मिळकत दळे मठ गट नं.५७० पैकी ०१ आणे ०३ पै. हिश्याचे क्षेत्र म्हणजेच दावा कलम १–अ मध्ये नमुद मिळकत. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यानचा वाद हा दावा कलम १–ब मध्ये नमुद ०५.०४ आर या क्षेत्रापुरता मर्यादीत आहे. सदर क्षेत्राचे सविस्तर वर्णन दावा कलम १ब मध्ये नमुद करण्यात आले आहे.

३. वादी यांच्या म्हणण्यानूसार दावा कलम १–अ ही मिळकत वादी नं.२ याने

त्याच्या नोकरीच्या पैशातुन स्वतः व भाऊ गोरखनाथ असे दोघांच्या नावे दि.१६/०४/१९८० रोजी रजिस्टर खरेदीपत्राने खरेदी केली आहे. त्यापैकी पुर्वेकडील ०८ पै. क्षेत्र वादी नं.२ याने स्वतःचे कब्जेवहिवाटीस ठेवुन पश्चिमेकडील उर्वरित ०७ पै. क्षेत्र भाऊ गोरखनाथ याच्या कब्जेवहिवाटीस दिले आहे. प्रतिवादी नं.३ याने दावा कलम १–ब मधील क्षेत्रात पाया खोदण्यास सुरुवात केली त्यामुळे वादी नं.२ याने त्याच्या विरुध्द रे.दि.मु.नं.५२/२००४ हा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि.२७/०७/२००७ रोजी झाला असुन प्रतिवादी नं.३ याच्या विरुध्द निरंतरची ताकीद देण्यात आली आहे.

४. वादी यांच्या म्हणण्यानूसार प्रतिवादी नं.३ याच्या सांगण्यावरुन प्रतिवादी नं.१ व २ यांनी वादी यांच्या दावा कलम १–ब मध्ये नमुद मिळकतीचे कब्जेवहिवाटीस हरकत–अडथळा सुरु केला आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. एकंदरीत, वादी यांच्या म्हणण्यानूसार दावा कलम १–ब या मिळकतीशी प्रतिवादी यांचा काहीएक संबंध नाही.

५. प्रतिवादी नं.१ हा निशाणी १२ (वकीलपत्र) अन्वये दाव्याकामी हजर झाला. तथापी, त्याने दाव्यास कैफीयत तसेच प्रस्तुत अर्जास त्याचे म्हणणे दाखल केले नाही.

प्रतिवादी नं.२ व ३ यांना समन्स व नोटीसची बजावणी होवुन देखील ते दाव्याकामी हजर झाले नाहीत. त्यामुळे दि.०७/०३/२०१७ व दि.२३/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुतचा दावा प्रतिवादी नं.२ व ३ यांच्या विरुध्द एकतर्फा चालविण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.१ ते ३ यांच्या विरुध्द दि.२३/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये विना–म्हणणे व एकतर्फा असा चालविण्यात आला.

६. वादी यांनी गट नं.५७० या मिळकतीचा ७/१२ उतारा निशाणी ०८ वर दाखल केला आहे. रे.दि.मु.नं.५२/२००४ मधील हुकूमनाम्याची सहीशिक्याची प्रत निशाणी ०९ वर दाखल केली आहे. वादी यांनी निशाणी ०३ सोबत दि.१७/०६/२०१६ रोजीच्या नोटीसची स्थळप्रत व दि.२५/०८/२०१६ रोजीचे नोटीस–उत्तर अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

७. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी नं.१ व त्याचे विधीज्ञ गैरहजर. सबब युक्तिवाद नाही. दावा व दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत येणेसाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांना सकृतदर्शनी केस आहे काय ? | **होय.** |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | **होय.** |
| ३ | प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल का ? | **होय.** |
| ४ | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

८. **मुद्दे नं.१ ते ३ करीता**–प्रस्तुत अर्जाचे पुष्ठयार्थ वादी नं.१ याने त्याचे शपथपत्र निशाणी ०६ वर दाखल केले आहे. दाव्यामधील कथनानूसार दावा कलम १ब हे क्षेत्र वादी नं.२ याने वादी नं.१ यास रजिस्टर बक्षिसपत्राने हस्तांतरीत केले आहे. प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी कैफीयत किंवा म्हणणे दाखल करुन दाव्यातील कथने नाकारलेली नाहीत. त्यामुळे दाव्यातील व प्रस्तुत अर्जातील कथने विनाहरकत अभिलेखावर आलेली आहेत.

९. गट नं.५७० या मिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर मिळकतीपैकी ०८ पै. हिश्याचे क्षेत्र वादी नं.१ याचे नावे आहे.

हुकूमनामा निशाणी ०९ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट नं.५७० मधील ०१ आणे ०३ पै. खरेदी क्षेत्रापैकी पुर्वेकडील ०४ आर क्षेत्राच्या कब्जेवहिवाटीस हरकत–अडथळा करु नये अशी निरंतरची ताकीद प्रतिवादी नं.३ विरुध्द देण्यात आलेली आहे.

१०. वरील चर्चेनूसार वादी यांनी दावा कलम १–ब वरील त्यांची स्वतंत्र कब्जेवहिवाट असल्याची बाब सकृतदर्शनी शाबीत केलेली आहे. त्यामुळे वादी हे मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद मिळणेस पात्र आहेत. तुर्तातुर्त ताकीद नामंजुर केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे. म्हणुन मुद्दे नं.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

११. **मुद्दा नं.४ साठी** – मुद्दे नं.१ ते ३ वरील निष्कर्षानूसार प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा नं.४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ०५ खर्चासह खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी दावा कलम १–ब या मिळकतीवरील वादी यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत–अडथळा करु नये, सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये व वादी यांना सदर मिळकतीमधून हद्दपार करु नये अशी तुर्तातूर्त ताकीद देण्यात येत आहे.

पाटण. (महेश व्ही.फडे)
दि.३१/०८/२०१७ सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पाटण.